09-12-2010

भाषणे

मुख्य विषय :

- आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यातील सुधारणा विधेयक
- नवीन अभ्यासक्रम विद्यापीठाच्या अखत्यारीत आणणे
- कुलगुरु निवडीची पद्धत व त्यातील त्रुटी

सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक-10 महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्याकरिता मांडलेल्या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी या विधेयकावर आपले विचार प्रकट केले आहेत. या बिलाबाबत माझ्या काही रिझर्व्हेशन्स आहेत. माननीय मंत्रीमहोदय त्यावर प्रकाश टाकतील अशी मी अपेक्षा करतो. माननीय मंत्रीमहोदय आणि मी या आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य आहोत. मंत्रीमहोदय प्रो-व्हीसी आहेत तर मी सिनेट सदस्य आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा पसारा आता वाढत चालला आहे. उद्देश व कारणे यामध्ये नमूद केले आहे की, "आरोग्य विज्ञानाशी संबंधित असलेले सर्व अभ्यासक्रम, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अधिकारितेत आणण्यात आले होते. तथापि, उक्त अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्व, उक्त अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही विद्यापीठामध्ये यात यापुढे ज्याचा निर्देश 'अनुसूचित विद्यापीठ' असा करण्यात आला आहे."

सभापती महोदय, अनेक अभ्यासक्रम विद्यापीठाच्या अधिकारितेत आणलेले असले तरी अजूनही फार मोठया प्रमाणात अभ्यासक्रम आणण्याची गरज आहे असे माझे स्पष्ट मत आहे. आज अनेक कोर्सेस नव्याने सुरु होत आहेत. नव्याने येत असलेल्या आजाराविषयीचे अभ्यासक्रम, नव्याने येत असलेल्या मेडिकल टेक्नॉलॉजीविषयीचे अभ्यासक्रम, पॅरा मेडिकल सायन्सबद्दलचे अभ्यासक्रम अशा अनेक गोष्टी आहेत. दक्षिण हिंदुस्थानामध्ये आरोग्य क्षेत्रात भरपूर प्रगती झालेली आहे. विविध गोष्टी आरोग्य क्षेत्रात नव्याने होऊ घातल्या आहेत. अनेक विदेशी विद्यापीठांबरोबर सामंजस्य करार होत आहेत. तसे या राज्यामध्ये झाल्याचे दिसून येत नाही. साधे उदाहरण द्यावयाचे झाले तर साथीच्या रोगावर असलेल्या अभ्यासक्रमाचे देता येईल. या अभ्यासक्रमामध्ये जे ग्रॅज्युएट आहेत, पोस्ट ग्रॅज्युएट आहेत अशी हाताच्या बोटावर मोजण्याइतकी माणसे मुंबईमध्ये आहेत. नव्याने काही करणार असाल तर अशी दालने विद्यार्थ्यांना उघडून देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मायक्रोबायॉलॉजी, बॅक्टॉलॉजी, पॅथॉलॉजी या शाखांमध्ये नवीन व्हायरस तयार होत आहेत. व्हायरस म्युटेट होत आहेत. नवीन रुप धारण करीत आहेत. नवीन लक्षणांसह आजार समोर येत आहेत. अशा आजारांचे निदान 'अज्ञात ताप' असे केले जाते. 2010 हे वर्ष सुरु

आहे. भारत महासत्तेकडे वाटचाल करीत आहे. अमेरिका, ब्रिटन या देशांबरोबर स्पर्धा करण्याचा ते प्रभारी नाहीत पण बाकीचे आणखी तीन पदे प्रभारीच आहेत, हे मंत्री महोदयांनी कबूल करावे. अशा प्रकारे विद्यापीठात होत असेल तर याकडे लक्ष का दिले जात नाही हा माझा प्रश्न आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे उक्त अधिनियमाच्या कलम 94 मध्ये हे अंतर्भुत करणार असे म्हटले आहे पण या कलम 94 चा आवाका किती मोठा आहे हे मात्र आपण सांगितले नाही. त्यातून आपल्याला काय काय अपेक्षित आहे याचा खुलासा झाला पाहिजे. तसेच या कलम 94 मध्ये जी तरतूद आहे ती प्रारंभीच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या अनुसूचीत विद्यापीठामध्ये नाव नोंदविलेल्या आणि जे अजूनपर्यंत अभ्यासक्रम पूर्ण करु शकले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांना, उक्त अधिनियमाच्या कलम 3 अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे विद्यार्थी असल्याचे मानण्यात येईल, असेही उद्देश व कारणे मध्ये सांगितलेले आहे. म्हणजे आपल्याला काय करावयाचे आहे हेच समजत नाही. पूर्वी मुंबई विद्यापीठ होते. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा कायदा झाला हे चांगले झाले, त्याबद्दल माझी कुठलीच तक्रार नाही परंतु मला दुर्दैवाने म्हणावेसे वाटते की, मी मुंबई विद्यापीठाचा विद्यार्थी आहे. मग तो एमबीबीएस असो अथवा बी.ए. अथवा बी.कॉम. चा विद्यार्थी असो. जेवढा अभिमान होतो तो आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या बाबतीत मात्र असे करण्याची का वेळ आली याची कारणमिमांसा मात्र स्पष्ट होणे आवश्यक आहे.

महोदय, दुसरा एक मुद्दा असा आहे की, आपल्याकडे प्रभारी कुलगुरु आहेत, कारण आपली कुलगुरु निवडीची पध्दत व त्यातील अटी व शर्ती कडक आहेत, त्यात लवचिकता आणणे आवश्यक आहे, तरच आपल्याला कुलगुरु मिळू शकतील असे मला वाटते. मी असे म्हणत नाही की पार नियम तोडून आणि मोडून आपण ही निवड करावी पण थोडीसी लवचिकता त्यात आणण्याची गरज आहे. आपल्या माध्यमातून मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, असे अनेक निर्णय आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्रलंबित आहेत व त्याचे कारण म्हणजे अनेक अधिकारी प्रभारीच आहेत. मी एका कॉलेजच्या संदर्भातील पत्र मंत्री महोदयांकडे पाठविणार आहे. त्या कॉलेजने स्पष्ट म्हटले आहे की, आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या व्ही.सी. नी जरी सांगितले असले तरी देखील

आम्हाला ते मान्य नाही. खाजगी विद्यापीठाच्या एका केसच्या बाबतीतील हिअरिंग व्ही.सी. नी घेतले आणि सांगितले की, आपल्या कॉलेजला हे लागू नाही परंतु ते कॉलेज आपल्या आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे म्हणणे ऐकण्यास तयार नाही, आपला निर्णय त्यांना मान्य नाही. आपण म्हणता की हे विद्यापीठ सार्वभौम आहे. अशा सार्वभौम विद्यापीठाला आणि शासनाला एखादे खाजगी कॉलेज अशा प्रकारे आव्हान देत असेल तर ते योग्य नाही.

महोदय, माझा तिसरा मुद्दा म्हणजे उक्त अधिनियमामध्ये विद्यापीठाच्या अशा कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य होण्याकरिता कोणत्याही विषयाच्या पात्रतेच्या शर्ती निर्धारित केलेल्या नाहीत याचा नेमका अर्थ काय आहे याचेही स्पष्टीकरण होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नवीन कलम 22 (ए) यामध्ये समाविष्ट करण्यात यावे यासाठी उक्त अधिनियमात सुधारणा करण्याची गरज आहे. हे कलम 22 (ए) नेमके काय आहे हे समजून सांगणे गरजेचे आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा वार्षिक अहवाल केवळ आमच्या माहितीसाठी नाही तर या सभागृहातील सदस्यांनी देखील सूचना केल्यास त्यांनाही मान मिळाला पाहिजे. तसेच कक्षेत बसत असेल तर त्याचे पालन सुध्दा करायला सांगणे आवश्यक आहे. कारण हे विद्यापीठ स्वायत्तता उपभोगते आणि लोकप्रतिनिधींना किंमत देत नाही, अशा प्रकारे अनेक अनुभव आपल्याला देखील आले असतील. विधेयक चांगले आले तरी या अनुषंगाने सर्वच गोष्टी स्पष्ट होणे आवश्यक आहे अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.